# ‘माझं नाव गौहर जान’

---

१८५0 ते १९३0 या काळातल्या चार ‘कोठे’वाल्या स्त्रिया फार गाजल्या - ‘कलकत्तेवाली गौहरजान’, ‘अलाहाबादची जानकीबाई’ व आग्रा इथल्या ‘मलकाजान व जोहराबाई’. दोघी मुसलमान तर दोघी हिंदू. आपापल्या गावाच्या नावावरूनच ओळखल्या जात. ‘तवायफ’ हया जमातीला मनोरंजनाच्या क्षेत्रात तो काळ अनुकूल होता हे खरंच. पण हया चौघींनी मिळून सुमारे पाचशेहून अधिक गाणी ग्रामोफोन रेकॉर्डस वर मुद्रित करून ठेवली. गाण्याच्या सुरूवातीला किंवा शेवटी त्या आपलं नाव मोठयानं व अगदी ठसक्यात सांगतात. उदाहरणार्थ ‘माय नेम इज गौहर जान...!’. त्याची ऐकणा-यांना मोठी मौज वाटते. त्यामुळेच आजही त्यांची आठवण गानरसिकांना वरचेवर होत असते. हया चौघींत ‘कलकत्तेवाली गौहरजान’ सगळयात अधिक प्रसिद्ध व मातब्बर! तिच्यावर सायबर विश्वात तीस हजारांहून अधिक संकेतस्थळं आहेत. पण त्यातली माहिती अपुरी व अनेकदा चुकीची व परस्पर विसंगतीनं भरलेली आढळते. त्यामुळेच बंगलोरच्या विक्रम संपत हया तिशीतल्या तरूणानं या विषयाचा ध्यासच घेतला व ‘माय नेम इज गौहर जान ः दि लाइफ अँड टाइम्स ऑफ ए म्युझिशियन’ हा ग्रंथ अलिकडेच सिद्ध केला.

विक्रम संपत हे शिक्षणानं इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर, गणितातले मास्टर व शिवाय एम. बी. ए. पदवीधारक. नोकरीला बंगलोरच्या बहुराष्ट्रीय बँकेत मोठया पदावर. पण मन मात्र सदैव इतिहास, संस्कृती व

संगीताकडं लागलेलं. अनेक विषयांवरचं स्फुट लेखन त्यांच्या नावावर आहे. २००८ साली दक्षिणेतल्या म्हैसूर शहराचा व राजघराण्याचा सहाशे वर्षांचा इतिहास त्यांनी आठशे पानी ग्रंथात मांडला व रूपा पब्लिकेशन्सनं प्रसिद्ध केला. त्याचवेळी म्हैसूर दरबारच्या दफ्तरातल्या गौहरजान विषयीच्या नोंदी व पत्रव्यवहार त्यांच्या पाहण्यात आला. कारण तिचा मृत्यू १९३० साली म्हैसूर दरबारच्या सेवेत असतांना एकाकी अवस्थेत झाला होता. १९२० पर्यंत प्रसिद्धी व ऐश्वर्याच्या सर्वोच्य स्थानावर असलेल्या हया गायिकेची अशी दयनीय अवस्था कशामुळं झाली या कुतुहलापोटी ही शोधयात्रा सुरू झाली. काम सोपं नव्हतं. पण अनेक 'गौहर'प्रेमींच्या निरपेक्ष सहकार्यानं हे काम पूर्ण झालं. त्या प्रवासाचा आढावा व सर्व संबंधितांचा ऋणनिर्देश 'दि जर्नी' हया लेखात सुरूवातीलाच केलेला आहे. एकूण तीन विभागात व सतरा प्रकरणात पुस्तकाची रचना केलेली आहे. 'दि मेकिंग ऑफ ए दिवा' (१८७५-१८९०)हया विभागात बालपण, शिक्षण, जडणघडण व 'मिस गौहरजान' हया नवतारकेचा उदय विस्तारानं दिलेला आहे. 'दि ग्लोरी इयर्स' या विभागात (१८९०-१९२०) वैभवाचा व कीर्तीशिखरावरचा कालखंड आला असून 'दि फॉल फ्रॉम ग्रेस' (१९२०-१९३०) या विभागात मनस्तापाचा व एकाकी जीवनाचा समावेश आहे. पुस्तकाच्या शेवटी चार परिशिष्टे असून त्यात उपलब्ध ध्वनिमुद्रिकांची शास्त्रशुद्ध यादी, विविध विषयांवरची मूळ कागदपत्रं, गौहरनं केलेल्या रचना व बंदिशी व तिच्या आईच्या पुस्तकातल्या निवडक शायरीचा (काव्याचा) समावेश आहे. शिवाय पुस्तकाच्या मध्यभागी अत्यंत दुर्मिळ अशी पन्नासेक रंगीत छायाचित्रं छापलेली आहेत. पुस्तकाबरोबरच पंचवीसेक

गाण्यांची ऑडियो सी.डी.दिलेली असून गौहरजानच्या गाण्यांचा ठेवा ऐकण्याची मोठीच सोय झालेली आहे.

गौहरजानचा जन्म आझमगढचा.२६ जून १८७३ चा.मूळ नाव मिस ॲंजेलिना यूवार्ड.वडिल रॉबर्ट विल्यम यूवार्ड, आर्मेनियन.आई व्हिक्टोरिया हेमिंग्ज.(व्हिक्टोरिया चे वडील ब्रिटिश तर आई 'रूक्मणी' हिंदू).व्हिक्टोरियाला काव्य, संगीत व नृत्याची प्रचंड आवड.तर रॉबर्टला तितकीच नावड! त्यातूनच १८७९ मध्ये घटस्फोट झाला.खुर्शेद नावाच्या मुसलमान मित्राबरोबर दोघी मायलेकी 'रूक्मणी'सह बनारसला आल्या.धर्मांतर करून त्याच्यासोबत राहू लागल्या.त्यानेही तिघींना भक्कम आधार दिला.आईनं 'मलकाजान' नाव घेतलं तर मुलीचं नामकरण 'गौहरजान' असं केलं.मलकाजाननं शेरोशायरी बरोबरच 'तवायफ'चा पेशा पत्करला व लवकरच आपलं बस्तान बसवलं.त्या काळी बनारसमध्ये याच नावाच्या आणखी तीन चार जणी होत्या.त्यांच्यात हीच वयानं मोठी.त्यामुळं ही 'बडी मलकाजान' नावानं नावारूपाला आली.तिनं मुलीच्यातले गुण हेरून तिला गाणं, नृत्य व विविध भाषा शिकवण्यासाठी अनेक शिक्षक नेमले.मायलेकींना आता हे शहर अपुरं पडणार हे लक्षात आल्यानं खुर्शेदनं त्यांना कलकत्त्याला स्थलांतर करायला राजी केलं.तिथं काही वर्षांतच मलकाजाननं आपल्या कलेच्या जोरावर ४0,000 रूपयांची हवेली खरेदी केली.मुलीच्या शिक्षणाबाबत ती अधिकच सजग बनली.लवकरच नवाब वाजिद अली शाहच्या दरबारात मायलेकींना बोलावणं आलं व नवाबानं त्यांची राजदरबारात नेमणूकच करून टाकली.१८८६ मध्ये बडी मलकाजानच्या उर्दू कवितांचा संग्रह

'मखझन-इ -उल्फत-इ-मल्लिका' प्रसिद्ध झाला. त्यात सुमारे सहाशे रचना असून काही ठुम-या पण आहेत. आज अत्यंत दुर्मिळ अश्या हया पुस्तकाची छायाप्रत लेखकानं प्रयत्नपूर्वक मिळवली असून त्यातल्या ७0 रचना छापल्या आहेत. शिवाय प्रत्येक प्रकरणाच्या सुरूवातीला एक कविता छापून गौहरच्या आईची स्मृती जागी ठेवली आहे. याच सुमारास अचानक खुर्शेदचा खून झाला व बडी मलकाजान सैरभैर झाली. पुढं ती १९0६ पर्यंत जगली. मुलीची भरभराट , कारकीर्द व ऐश्वर्य तिनं पाहिलं.

गौहरचा पहिला जलसा वयाच्या पंधराव्या वर्षी दरभंगा रियासतीत झाला. त्यानंतरची वीस पंचवीस वर्षे तिनं गाजवली. हिंदुस्थानभर तिचा संचार होता. अगदी दक्षिणेकडं म्हैसूर व मद्रासमध्ये तिचे जलसे झाले. त्या काळच्या अनेक संस्थानांमध्ये तिला मानाचं पान होतं. त्याचं एक प्रमुख कारण म्हणजे तिच्या ग्रामोफोन रेकॉर्डस. १९0२ ते १९२0 या काळात विविध ग्रामोफोन कंपन्यांकरता तिनं दीडशेच्यावर गाणी मुद्रित केली. त्यात रागदारी व सुगम संगीत तसेच अरेबिक, बंगाली व अगदी इंग्लिश भाषेतल्या गाण्यांचाही समावेश आहे. हया माध्यमातून तिचं गाणं राजेरजवाडयांपासून ते सर्वसामान्य रसिकांपर्यंत पोहोचलं व ग्रामोफोन कंपनीला हिंदुस्थानात आपलं बस्तान बसवता आलं. १९0८ साली कंपनीनं कलकत्त्यास रेकॉर्डस छापायचा कारखाना काढला. त्या प्रसंगी तिचा खास सन्मान करून जलसा आयोजित केला होता. तिचा ध्वनिमुद्रक गैसबर्ग हयानं त्याच्या पुस्तकात तिचा उल्लेख 'आर्मेनियन-ज्यूएस' असा केला असल्यानं तीच माहिती आजतागायत प्रचारात

होती. प्रस्तुतच्या पुस्तकातल्या पुराव्यांमुळे तिच्या 'ज्यू' पणाविषयी शंका निर्माण झाली आहे.

गौहरजानचा उल्लेख, 'हिंदुस्थानची बुलबुलःनाईटिंगेल ऑफ इंडिया' असा गोविंदराव टेंबे यांनी केला आहे. तिनं स्वतः काही रचनापण केल्या आहेत. 'कैसी ये धूम मचायी' व 'रसके भरे तोरे नैन' हया रचना तिनं केलेल्या आहेत याचा भल्या भल्या गायक/गायिकांनाही पत्ता नाही. तिच्या काही रचनांमध्ये 'छगनपिया' असा उल्लेख येतो. बनारसचे राय छग्गन हयांच्या प्रेमात व सहवासात ती काही काळ होती. तिच्या साठेक वर्षांच्या आयुष्यात चार पाच पुरूष आले पण कुठलंच नातं फार काळ टिकलं मात्र नाही. अगदी शेवटी तिच्याहून कितीतरी तरूण वयाच्या सेक्रेटरीशी तिनं 'मुता' विवाह केला होता. पण त्यातून कोर्ट कचे-या, मनस्ताप व नातेवाईकांनी केलेली संपत्तीची लूट पाहणंच तिच्या नशीबी आलं.

१९०७-१० च्या सुमारास ती अनेकदा मुंबैस येऊन गेली. अंजनीबाई मालपेकर हयांच्याशी तिची खास मैत्री होती. गुजराथी रंगभूमीवरचे सुस्वरूप नट अमृत केशव नायक (हयांच्या नावाचा रस्ता आज फोर्टा त खादी भांडाराच्या मागच्या गल्लीत आहे) हयांच्या ती प्रेमात पडली व दोन वर्षे दोघे एकत्र रहात होती. त्यांच्या पाया पडून मिळवलेला 'आन बान जियामें लागी' हा दादरा तिनं पुढं मुद्रित केला व तो अफाट गाजला. मुंबईत असतांना दिवसा महालक्ष्मी रेसकोर्स व रात्री गाणं बजावणं असा तिचा दिनक्रम असे. बोरीबंदर समोरच्या आजच्या ओसाड 'कॅपिटॉल' सिनेमात तिचे जलसे होत. १९०७ साली दक्षिण

मुंबईत एशियाटिक सोसायटीच्या दरबार हॉल मध्ये तिचं गाणं झालं. पुढे पुण्यातल्या एका मुक्कामात तिनं उस्ताद अब्दुल करीम खान हयांची भेट घेऊन दुवा मागितला तर बालगंधर्वांची नाटकं पाहून 'तुम्ही तर माझ्याच रेकॉर्डस गाता' असं त्यांनाच सुनावलं. पुढं हिराबाईंना दत्तक घ्यायची तयारी दाखवली. त्यांना 'राधे क्रिष्ण बोल मुखसे' हे भजन शिकवलं. छोटया बेगम अख्तरचं गाणं ऐकून ही मुलगी पुढं नाव काढेल असं भाकित केलं. बंगालची विख्यात गायिका मिस इंदुबाला हिला तर मुलगी मानून विद्या दिली. सिद्धेश्वरी देवींसारख्या अनेक गायिकांनी तिच्या रेकॉर्डसनाच गुरू मानलं होतं. तीन साडेतीन मिनिटांत गाणं मांडायचा वस्तुपाठच अनेकांना मिळाला.

गौहरजानच्या गाण्याचे टीकाकारही होते. १९१२ सालच्या बंगलोर इथल्या कार्यक्रमाच्या वृत्तांतात तिचं गाणं सामान्य दर्जाचं व पिटातल्या प्रेक्षकांना रिझवणारं होतं असं म्हटलंय. विख्यात गवई पं. दिलीपचंद्र वेदी हयांनी तिच्या अनेक मैफिली ऐकल्या व खयाल गायनात ती फारशी चमक दाखवत नसे असं मत प्रकट केलं. या ऊलट काश्मीरचे महाराज हरी सिंग व पं. विष्णु नारायण भातखंडे हयांनी तिच्या गाण्याची स्तुती व कौतुकच केलं आहे. दतिया संस्थानाच्या महाराजांनी तिला झालेली 'ग' ची बाधा कशी उतरवली त्याचा किस्सा मुळातूनच वाचावा असा आहे.

गौहरजानच्या नंतर प्रसिद्धीला आलेल्या शास्त्रीय, सुगम व अगदी चित्रपट संगीताच्या क्षेत्रातही नावारूपाला आलेल्या अनेक गायिकांच्या

जीवन चरित्रात विलक्षण साम्यस्थळं आढळतात. त्यात खंबीरपणं पाठीशी उभी असलेली आई आहे. विफल प्रेम प्रकरणांतून व वेदनेतून ऊमटलेले सूर आहेत. समवयस्क व समकालीनांशी केलेली अटीतटीची स्पर्धा आहे. अहंमन्यता व श्रेष्ठत्वाची भावना आहे. आयुष्याच्या सायंकाळी आलेला एकाकीपणा आहे. ज्या कुणी भक्तीमार्गाकडं व विद्यादानाकडं वळल्या त्यांचं चरित्र काहीसं निराळं झालं आहे.

१९२० च्या सुमाराचा कालखंड हा 'अँटी नाच गर्ल्स' चळवळीचा होता. तिकडे दक्षिणेकडे 'देवदासी निर्मूलना'ची आघाडीपण उघडण्यात आलेली होती. यात गुंतलेल्या सर्वच स्त्रियांना सरसकट 'वेश्या' असं संबोधण्यापर्यंत आंदोलकांची मजल गेली होती. त्याचा फटका अनेकींना बसला. अश्या संक्रमणाच्या काळात गौहरजान एक प्रकारच्या विजनवासात म्हैसूर दरबारात आश्रयाला गेली. जिनं आपल्या पाळीव प्राण्यांचे वाढदिवस हजारो रूपये खर्चून साजरे केले, गांधीजींच्या स्वराज्य फंडाला विशेष जलसा करून भरघोस रक्कम मिळवून दिली, आलिशान बग्गीतून फेरफटका मारण्याच्या प्रमादाबद्दल रोज शंभर रूपये दंड भरला त्या गौहरजानला मासिक पाचशे रूपयांच्या तुटपुंज्या पेन्शनवर अखेरचे दिवस काढावे लागले. ती गेली तेव्हां म्हैसूरच्या इस्पितळात जवळचं कोणीही नव्हतं. शोध घेऊनही लेखकाला तिची कबर सापडली नाही. मात्र तिनं मागं ठेवलेल्या व संग्राहकांनी जीवापाड जपलेल्या ध्वनिमुद्रिकांतून तिचा मंजूळ आवाज मात्र जपलेला आहे. गूंजत राहणार आहे.

प्रस्तुत पुस्तकाचा प्रकाशन समारंभ एप्रिल २०१० मध्ये दिल्ली येथे उपराष्ट्रपती मा. हमीद अन्सारी हयांच्या हस्ते त्यांच्या निवासस्थानी

झाला.पाठोपाठ बंगलोर येथे पं.जसराजजी यांच्या हस्ते समारंभ झाला.कोलकाता येथे हॉटेल ताज बेंगाल मध्ये विदुषी गिरीजा देवींच्या हाती तर चेन्नई येथे राज्यपालांच्या हस्ते तिथल्या ताज महाल हॉटेलात झाला.मुंबईत लवकरच होणार आहे.असं भाग्य क्वचितच एखाद्या पुस्तकाच्या वाटयाला येतं.आज शंभर वर्षांनी गौहरजानच्या पुस्तकाच्या विमोचनाचा थाट तिच्या इतमामास साजेसा होतो आहे.हया विलक्षण योगायोगाचं मोठंच आश्चर्य वाटतं.

---

'माय नेम इज गौहर जान!'
दि लाइफ अँड टाइम्स ऑफ ए म्युझिशियन
लेखक - श्री.विक्रम संपत, रूपा पब्लिकेशन्स, नवी दिल्ली
२०१० .पाने ः ३१८ .किंमत रू.५९५ .

---

डॉ.सुरेश चांदवणकर, १६ मे २०१०
Chandvankar.suresh@gmail.com